RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS /173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ४, अंक २२] बुधवार, फेब्रुवारी २१, २०१८/फाल्गुन २, शके १९३९ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २१ फेब्रुवारी २०१८

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर १०१३/प्र.क्र. ५०/१३/१४-अ.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश आणि अनुदेश यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील " लिपिक-टंकलेखक ", गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१८ असे संबोधण्यात यावे. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदासाठी स्वतंत्र सेवाप्रवेश नियम लागू केले असतील, त्या कार्यालयांतील पदांना प्रस्तुत नियम लागू होणार नाहीत.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " प्रशासकीय विभाग " याचा अर्थ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-१६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला विभाग व त्यामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये असा आहे ;

(ख) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(ग) " पदवी "याचा अर्थ सांविधिक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता ;

(घ) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे ;

(च) " शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र " याचा अर्थ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासकीय परीक्षा मंडळाचे टंकलेखनाचे किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र असून, यात शासनाने या प्रयोजनार्थ मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले प्रमाणपत्राचा समावेश होतो ;

(छ) " गट-ड " याचा अर्थ शासनाकडील गट-ड मध्ये येणारी पदे असा आहे ;

(ज) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) अन्वये गठित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

३. बृहन्मुंबईतील शासकीय कायार्लयातील लिपिक-टंकलेखक, गट-क या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :-

(क) गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व गट-ड मधील पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेद्वारे नामनिर्देशनाद्वारे,–

(एक) खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी एकोणीस वर्षांपेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या,

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे, आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे;

किंवा

(ग) अनुकंपा तत्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार, खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांची अनुकंपा तत्वावर नियुक्तीने;

किंवा

(घ) गट-क मधील वाहनचालक या पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व लिपिक-टंकलेखक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तींमधून, ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहनचालक या पदावरुन नियुक्ती दिलेल्या व्यक्तींची लिपिक-टंकलेखक पदावरील सेवाज्येष्ठता लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल:

परंतु, माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी खंड (ख) च्या उप खंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, सदर अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर सदर पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज करण्यास परवानगी दिली जाईल:

परंतु आणखी असे की, सदर पदावर माजी सैनिक वर्गातून नियुक्त झालेल्या व्यक्तीने खंड (ख) च्या उप खंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्यांच्या कालमर्यादेत धारण न केल्यास, सदर व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, सदर पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्त होणारी व्यक्ती खंड (ख) च्या उप खंड (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत नसेल तर, अशा व्यक्तीने सदर अर्हता शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा याबाबतीत शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कारवाई करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, सदर सेवाप्रवेश नियम शासन **राजपत्रात** प्रसिद्ध होणाऱ्या दिनांकापूर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीत अंतर्भूत केलेल्या उमेदवारांना माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र हीच शैक्षणिक अर्हता लागू राहील. तथापि, हे सेवाप्रवेश नियम **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अनुकंपा तत्वाद्वारे नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादीत नाव नोंदविण्याकरीता खंड (ख) च्या उप खंड (दोन) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता लागू राहील:

परंतु आणखी असे की, खंड (ख) च्या उप खंड (एक) मध्ये विहित केलेली उच्चतम वयोमर्यादा ही अनुकंपा आणि माजी सैनिक, अपंग व खेळाडू यासारख्या समांतर आरक्षणांतर्गत वर्गातून नियुक्त करावयाच्या उमेदवारांना लागू राहणार नाही. सदर वर्गातील उमेदवारांना शासनाने वेळोवेळी घोषित केलेले उच्चतम वयोमर्यादेसंदर्भातील प्रचलित धोरण लागू राहील.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ४० : ५० : १० असे राहील :

परंतु असे की, पदोन्नतीने किंवा वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना पदोन्नतीचे व वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीचे प्रमाण शिथिल करून उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा, आवश्यक असल्यास, उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर मंत्रालयीन विभागात नियुक्त झालेली व्यक्ती, मंत्रालयातील कोणत्याही विभागात बदलीस पात्र राहील. तसेच बृहन्मुंबईतील इतर शासकीय कार्यालयात नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार पदावर बदलीस पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**इ. मु. काझी,**
शासनाचे सहसचिव.

क्रमांक आरटीआर १०१३/प्र.क्र. ५०/ १३/१४अ
**सामान्य प्रशासन विभाग,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक २१ फेब्रुवारी २०१८.

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१४. * प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१५ *सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६. *महालेखापाल, महाराष्ट्र- १ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
१७. *महालेखापाल, महाराष्ट्र- १ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१८. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१९. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिद्धीकरिता)
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३. बृहन्मुंबईतील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२४. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीकरिता),
२५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६ वा मजला, विधान भवन, मुंबई-३२. (१० प्रती)
२६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२७. निवडनस्ती.

---

(*पत्राने)

**इ. मु. काझी,**
शासनाचे सहसचिव.

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 21st February 2018

*NOTIFICATION*

**CONSTITUTION OF INDIA.**

No. RTR 1013/ CR. 50/ 13/14-A.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Clerk-Typist, Group-C in the Government offices in Brihan Mumbai, namely :—

1. These rules may be called the Clerk-Typist, Group C in the Government offices in Brihan Mumbai (Recruitment) Rules, 2018. These rules shall not be applicable to such post of Clerk-Typist post in Government Offices in Brihan Mumbai, for which the concerned Administrative Department has separately framed the recruitment rules.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Administrative Department" means the Department specified in the First Schedule appended to the Maharashtra Government Rules of Business made under article 166 of the Constitution of India and includes the offices covered thereunder ;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*c*) "degree" means a degree of any discipline of a statutory University or any other qualification declared by the Government to be equivalent thereto ;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*e*) "Government Commercial Certificate" means a certificate in typewriting or computer typewriting awarded by the Maharashtra State Council of Examinations or Bureau of Government Examination, Department of Education, Government of Maharashtra and it includes a certificate issued by any other institution as may be specifically approved by the Government for this purpose;

(*f*) " Post in Group-'D' " means post falling in Group-'D' of the Government ;

(*g*) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board constituted under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by the Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post of Clerk-Typist, Group 'C', in Government offices in Brihan Mumbai, shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person, on the basis of seniority, subject to fitness from amongst the persons holding the post in "Group-'D'", having not less than three years of regular service on that post in Group 'D' and possess qualifications mentioned in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (b);

or

(*b*) by nomination, on the basis of result of competitive examination held by the Commission, from amongst the persons who,—

(*i*) are not less than nineteen years of age and not more than thirty-eight years of age in case of persons belonging to general category and not more than forty-three years of age in case of persons belonging to reserved category ;

(*ii*) possess a degree ; and

(*iii*) possess the Government Commercial Certificate or Computer Typing Certificate with a speed of not less than 30 words per minute in Marathi Typewriting or 40 words per minute in English Typewriting ;

or

(*c*) by appointment of a suitable person on compassionate ground, in accordance with the orders issued in this behalf by the Government, from time to time, who possess qualifications specified in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*b*) ;

or

(*d*) by permanent cadre transfer of a suitable person from amongst the persons holding the post of Driver, Group 'C', who prefer the post of Clerk-Typist, having completed not less than

three years of regular service on the post of Driver and possess qualifications mentioned in sub-clauses (*ii*) and (*iii*) of clause (*b*), on the basis of seniority subject to fitness. The seniority of Drivers on the post of Clerk-Typist shall be fixed from the date of appointment to the post of Clerk-Typist :

Provided that, a person, eligible to appear from the class of ex-servicemen, who does not possess the qualifications mentioned in sub-clause (*iii*) of clause (*b*), shall be allowed to appear for the said examination, subject to the condition that, such person shall acquire this qualification within the period of eleven months from the date of his appointment:

Provided further that, if a person appointed from the class of ex-servicemen does not possess the qualification mentioned in sub-clause (*iii)* of clause (*b*), within the period of eleven months from the date of his appointment, such person shall be liable to be terminate from the service.

Provided also that, a person appointed on the compassionate ground does not possess the qualifications mentioned in sub-clause (*iii*) of clause (*b*) within the period specified by the Government, from time to time, then the action shall be taken as per the orders issued by the Government, from time to time, in this regard :

Provided also that, the educational qualification of Secondary School Certificate shall be applicable to the candidates for appointment on compassionate ground, who are included in the waiting list for appointment on compassionate ground, before the date of publication of these recruitment rules in the *Official Gazette* ; and from the date of the publication of these recruitment rules in the *Official Gazette*, the educational qualifications prescribed in sub-clause (*ii*) of clause (*b*) shall be required for including the name in the waiting list for appointment on compassionate ground :

Provided also that, the upper age-limit mentioned in sub-clause (*i*) of clause (*b*) shall not apply to the person appointed on the compassionate ground and classes reserved for horizontal reservation such as Ex-servicemen, Differently abled persons and sports persons. Upper age limit for the candidates belonging to such classes shall be as per the prevalent policy declared by the Government in this regard, from time to time.

4. Appointment to the post mentioned in rule 3, shall be made by promotion, nomination including the appointment on the compassionate ground and Permanent transfer from Driver cadre, in the ratio of 40:50:10, respectively:

Provided that, if suitable candidates possessing prescribed qualifications mentioned for promotion or by Permanent transfer from Driver cadre are not available, the Appointing Authority may relax the ratio for appointment by promotion and by Permanent transfer from Driver cadre and may appoint the candidates by nomination.

5. A person appointed to the post mentioned in rule 3, shall possess a Certificate in Computer Operations as prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra from time to time.

6. A person appointed to the post mentioned in rule 3, shall be required to pass the Departmental Examination if required, according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing that examination.

7. A person appointed to the post mentioned in rule 3, shall be required to pass the examinations in Hindi and Marathi languages according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

8. A person appointed to the post mentioned in rule 3, in Mantralaya shall be liable to be transferred to any department in Mantralaya and a person appointed in the Government offices in Brihan Mumbai shall be liable to be transferred on the post decided by the concerned authority competent to transfer.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. M. KAZI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

No. RTR. 1013/C.R. 50/13/14A
General Administration Department,
Mantralaya, Mumbai 400 032,
dated 21st February 2018.

**Copy forwarded with compliments to—**

1. The Secretary to the Governor, Raj Bhavan, Malbar Hill, Mumbai,
2. The Principal Secretary to the Chief Minister,
3. The Private Secretary to all Ministers/State Ministers,
4. Hon'ble Opposition Leader, Legislative Council of the State of Maharashtra/Legislative Assembly of the State of Maharashtra,
5. All Hon'ble Members of the Parliament/Members of the Legislative Council of the State of Maharashtra/ Members of the Legislative Assembly of the State of Maharashtra,
6. The Chief Secretary,
7. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Mantralaya Departments,
8. All Mantralaya Departments,
9. *The Registrar, High Court (Original Side), Mumbai,
10. *The Registrar, High Court (Appellate Side), Mumbai,
11. *The Registrar, Office of the Loka Ayukta and Upa-Loka Ayukta, Mumbai,
12. *The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,
13. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Assembly), Mumbai,
14. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Council), Mumbai,
15. *The Secretary, State Election Commission, New Administrative Building, Mumbai,
16. *The Accountant General, Maharashtra-1 (Account and Entitlement), Maharashtra, Mumbai,
17. *The Accountant General, Maharashtra-1 (Audit), Maharashtra, Mumbai,
18. *The Secretary, Office of the Chief Information Commissioner of the State, New Administrative Building, Mumbai,
19. *The Registrar, State Human Rights Commission, Mumbai 400 001,
20. The Director General of Information and Public Relations, Mumbai (2 copies for publicity),
21. Pay and Accounts Officer, Mumbai,
22. Resident Audit Officer, Mumbai,
23. All Heads of Departments and Heads of Offices in Brihan Mumbai,
24. General Administration Department/Desk 39 (For publishing on website),
25. The Librarian, Secretariat of Maharashtra Legislature, Library, 6th Floor, Vidhan Bhavan, Mumbai 400 032 (10 copies),
26. All Desks of General Administration Department,
27. Select File.

(* By Letter)

I. M. KAZI,
Joint Secretary to Government.